# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**ओम् सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/संकीर्ण/२०२३/ 5146 दिनांक : 2 NOV 2023

**परिपत्रक-**

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका/पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
पुणे विभाग, पुणे.

**विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची शै.वर्ष २०२३-२४ साठीच्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ-** १. संचालनालयाचे पत्र जा.क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२३-२४/२४५ दि.२०.१०.२०२३
२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File ४९-१/SAG Bureau/Sch./Adv./Pragati & Saksham/2023-24 दि.०५.१०.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका/पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर तिन्ही योजनांची माहिती संदर्भिय पत्रामध्ये देण्यात आली आहे. (सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.)

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (NSP) पोर्टलद्वारे (संकेतस्थळ- www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. सन २०२३-२४ करिता सदर योनजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी नवीन (Fresh)अर्ज व सन २०२२-२३ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी नूतनीकरण अर्ज भरतेवेळी , विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आधार क्रमांकाची नोंद करून (जर आधार क्रमांक नसेल तर आधार रजिस्ट्रेशन क्रमांकानुसार) NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहिर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे.(अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual/ Guideline चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी (मंजूर/ नामंजूर) करावी.

सोबत- संदर्भिय पत्र क्र.०१

**(डॉ. दत्तात्रय जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

F/c

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२३-२४/२४५
दिनांक : २० / १० / २०२३

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची शै. वर्ष २०२३-२४ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File No. ४९-१/StDC/ SAG Bureau /Sch. /Adv./Pragati & Saksham/२०२३-२४ -दि. ०५.१०.२०२३

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता **तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर तिन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Pragati Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थीनीं साठी** प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखापर्यंत** असावे व एका कुटूंबातील **केवळ दोन मुलींना** सदर योजना लागू राहील.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच तसेच नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.



तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
01 NOV 2023
आवक क्र. ee3c

- नविन संच / कोटा (Quota) :-

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- शिष्यवृत्ती रक्कम :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम (Lump sum Amount) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | रु. ५०,०००/- प्रति वर्ष |

## ब) सक्षम शिष्यवृत्ती योजना ::

[AICTE-Saksham Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मंजूरी प्राप्त संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखापर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असावे** असे निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- नविन संच / कोटा (Quota) :-

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- शिष्यवृत्ती रक्कम :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम (Lump sum Amount) |
|---|---|---|
| ब | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | रु. ५०,०००/- प्रति वर्ष |

## क) स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :

[AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका,पदवी) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत** अशा विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

प्रक्रियक प्रीत्यर्थी शिक्षाईकार
प्रति
01 NOV 2023
आवक लिपिक

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संपूर्ण देशासाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- नविन संच/कोटा (Quota)

| अ क्र. | अभ्यासक्रम | संपूर्ण देशासाठी संच संख्या |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु.५०,०००/- प्रति वर्ष** |

उपरोक्त तिन्ही योजनेची सविस्तर माहिती व पात्रतेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **शै. वर्ष २०२३-२४ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **शै. वर्ष २०२२-२३ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण ( Renewal )** अर्ज भरतेवेळी, **विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आधार क्रमांकाची नोंद करुन** ( जर आधार क्रमांक नसेल तर **आधार रजिस्ट्रेशन क्रमांकानुसार** ) NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| **विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२३-२४** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम दिनांक** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ डिसेंबर, २०२३ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे | १५ जानेवारी, २०२४ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

**महत्त्वाची सूचना-**

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी. तसेच **शै. वर्ष २०२३-२४ पासून संस्थेच्या एनएसपी पोर्टलवर नोंदणी असलेल्या,** Head

of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO) यांचे Aadhaar Authentication अनिवार्य केलेले आहे. त्याबाबतचे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org) schemes /students-development-schemes/Pragati/General-Instructions अंतर्गत Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO) Aadhaar Authentication बाबतचे Operating Manual देण्यात आलेले आहेत, **त्याचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही करावी.**

२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी व पात्र विद्यार्थ्याला अर्ज भरण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या अर्ज भरण्यापासून वंचित राहाणार नाही.

३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.

४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**

५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**

६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत -.

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा.अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७वा मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

३. मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग आयुक्तालय,३ चर्च पथ, पोलिस आयुक्त कार्यालयाजवळ,आगरकर नगर, पुणे- ४११ ००१.(Email id-comm.socwelfare@maharashtra.gov.in)

४. मा. आयुक्त, अदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन, १ ला मजला , जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक-४२२ ००२. .(Email id-ctd.nsk-mh@gov.in)

५. मा. संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग संचालनालय,३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, ३ , बी. जे. मेडिकल रोड, पुणे — ४११ ००१. .(Email id-dvjntobcsbcwpune@hmail.com)

६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर. .(Email id-schol.dhepune@gov.in)

७. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व सदर योजनाची अंमलबजावणीबाबत त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना जाहिर वेळापत्रकानुसार न चुकता कार्यवाही पूर्ण करुन घेण्यासाठी. .(Email id-rooffice@dtemaharashtra.gov.in)